राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

## वर्ष २०२२-२३

**नवोपक्रम गट क्र.०३ माध्यमिक व उच्च माध्यमिक गट**

## नवोपक्रम शीर्षक

## एक बी जगण्यासाठी,उद्यासाठी,भविष्यासाठी

## सादरकर्ती

**श्रीम. खडके अनिता मारोती**

जिल्हा परिषद प्रशाला, भादा, ता. औसा जि. लातूर

युडायस क्र २७२८०३ ०८००१

## प्रेरणा

**मा. श्री. राजेंद्र गिरी**

**प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था लातूर**

## प्रेरणा

**मा. श्रीम अनुपमा भंडारी**

**गटशिक्षणाधिकारी, प.स.औसा जिल्हा लातूर**

**डॉ. भागीरथी गिरी, डॉ. जगन्नाथ कापसे (वरिष्ठ अधिव्याख्याता), जि.शि.व प्र. संस्था लातूर डॉ. राजेश गोरे, श्री मुकुंद दहिफळे (अधिव्याख्याता) जि.शि.व प्र. संस्था लातूर**

## मार्गदर्शन

**मा. मोहन माकणे**

**मुख्याध्यापक, जि.प.प्रशाला, भादा, ता औसा**

**मा. श्री नागेश पाटील, श्रीम. साधना मंठाळे**

**जि.प.प्रशाला, भादा, ता औसा**

# अनुक्रमणिका


| अनु क्र | तपशील |
| --- | --- |
| ०१ | नवोपक्रमाचे शीर्षक |
| ०२ | नवोपक्रमाची गरज |
| ०३ | नवोपक्रमाची उद्दिष्ट्ये |
| ०४ | नवोपक्रमाचे नियोजन |
| ०५ | नवोपक्रमाचे महत्व |
| ०६ | नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही |
| ०७ | नवोपक्रमाचे निष्कर्ष |
| ०८ | नवोपक्रमाचे फायदे |
| ०९ | नवोपक्रमाची यशस्विता |
| १० | संदर्भ ग्रंथ |
| ११ | महत्वाच्या युट्यूब लिंक |

## १. नवोपक्रमाचे शीर्षक :

**एक बी जगण्यासाठी, उद्यासाठी भविष्यासाठी**

## २. नवोपक्रमाची गरज

आपल्या सभोवार जे जे काही दिसते ते ते म्हणजे पर्यावरण. पर्यावरण म्हणजे निसर्ग, हवा, पाणी, हवेतील विविध वायू, सर्व सजीव, निर्जीव गोष्टी म्हणजेच वनस्पती, प्राणी, हवा या सर्व गोष्टींचे आपल्या आजूबाजूला जे आवरण आहे तेच पर्यावरण होय.

निसर्गातील या सर्वच गोष्टी मानव उपयोगी व मन प्रसन्न करून टाकणारे आहेत. पण स्वतःच्या सुखासाठी निसर्गावर मात करण्याच्या इच्छेने मानवाने निसर्गाचा समतोल बिघडवला आहे. याचा परिणाम पर्यावरणावर होऊ लागला. औद्योगीकरण जंगलतोड यामुळे हवामानात बदल झाला. जमिनीची धूप वाढली. जमिनीचा कस कमी झाला.

रासायनिक कीटकनाशकामुळे विषारी द्रव्याचा परिणाम जीवसृष्टीवर व मानवी जीवनावर होऊ लागला. येथील दूषित पाणी, कचरा, नद्यात सोडल्यामुळे पाणी, वनस्पती, मासे नष्ट होऊन जल प्रदूषण वाढले. कारखान्याच्या वाहनांच्या धुरामुळे हवेचे प्रदूषण वाढले. रस्ते, घरे बांधण्यासाठी डोंगर व झाडांचा नायनाट होऊ लागला. गाड्यांचे आवाज हॉर्न, यंत्रणाचा आवाज, नगारे, लाऊड स्पीकर, रेडिओ, टीव्ही यांच्या कर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होऊन शारीरिक आजार होऊ लागले. वाढती लोकसंख्या शहरीकरण यामुळे प्रचंड कचरा निर्मिती होऊन दुर्गंधी व रोगराई होऊ निर्माण होऊ लागली.

थोडक्यात, माणसाने स्वतःच स्वतःला धोकादायक परिस्थिती निर्माण करू लागला. विनाशाकडे वाटचाल चालवली आहे. दूषित हवा दूषित अन्नपदार्थ यामुळे माणसे व्याधीग्रस्त होत चालली आहेत. दूषित वायूमुळे पृथ्वीभोवती असणाऱ्या ओझोनच्या संरक्षणात्मक कवचाला धोका निर्माण होऊन त्यातून येणाऱ्या अतिनील किरणामुळे त्वचा व

डोळ्याचे विकार होऊ लागले आहेत. अमाप जंगल व वृक्षतोडी शुद्ध हवा, पाऊस, पाणी, अन्नधान्य यांची टंचाई निर्माण झाली आहे.

एवढेच नव्हे तर उन्हाचा प्रचंड तडाका वाढला. कुणी म्हणतो सूर्य आग ओकतोय तर कोणी म्हणतोय सूर्य संतापलाय. पृथ्वीची तापमानात वाढ झाली आणि अशावेळी शाळा सुद्धा अर्धवेळ झाली. उन्हामुळे घशाची कोरड वाढते. आपण कुठून तरी पाणी आणून गरज भागवू पण जनावराचे कसे होणार? त्यांचे पोट भरण्यासाठी पाण्याचे नैसर्गिक साठेच लागतात. ते सुद्धा आटलेत. एकूणच मुले शाळा सुटली की झाडाच्या सावल्या सावल्याने रस्ता काढू लागले व घर गाठू लागले. पत्र्याच्या घरात घामाघुम होऊन जाणाऱ्या आपण मध्येच वाऱ्याची झुळूक आली की वाळवंटातील ओयासिसची आठवण येते. उन्हाच्या तडाख्यात मात्र झाडांना अनन्य साधारण महत्त्व येते. झाडांच्या गरजेचा विचार वाढल्यानेच जिल्हा परिषद प्रशाला भादा तालुका औसा जिल्हा लातूर येथे माध्यमिक शिक्षिका अनिता खडके यांनी मुलांच्या समोर मार्च महिन्यातच एक बी

उद्यासाठी सृजनशील निर्मितीसाठी भविष्यासाठी हा विषय मुलांच्या समोर ठेवला आणि मुलांनी यावरती खूप छान चर्चा घडवून आणले. यातून मुलांना पर्यावरणाचे महत्त्वही कळाले. चर्चेत उत्तम सहभाग घेतला. शिक्षिकेला ही कोणत्या मुलांमध्ये कोणते गुण आहेत याची कल्पना आली. त्याच प्रमाणे बाईंनी मुलावरती काही जबाबदाऱ्या पण सोपवल्या. मुलांनो आपल्या परिसरात अंगणात शाळेत शेतीतील झाडांच्या खाली सध्या परिस्थितीमध्ये अनेक बिया आहेत व आपले बाबा पण बाजारातून फळे आणतात ना? मग हे बी आपण जमा करूयात. सुरुवातीला बाईनी मुलांना घेऊन शाळेतील झाडांच्या बिया जमा केल्या. हळूहळू मुले अनेक झाडांच्या जवळपास 200 बियांच्या पिशव्या तयार केल्या. म्हणजे बियांची बँक तयार झाली.

## ३. नवोपक्रमाची उद्दिष्टे

a. पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न करणे.

b. निसर्गाचा सहवास आणि प्रेम वाढवणे.

c. निसर्गाच्या रक्षणाची आणि संवर्धनाची जाणीव वाढवणे.

d. निसर्ग भेटीतून मुले सृजनशील व संवेदनशील बनवणे.

## ४. नवोपक्रमाचे नियोजन

पाऊस गेला; थंड वारे गेले.

ऑक्सिजन गेला; आरोग्य गेले.

पाणी गेले; पशुपक्षी गेले.

वनस्पती गेल्या; अन्नधान्य गेले.

एवढे अनर्थ एका वृक्षतोडीने केले.

हा विचार वारंवार विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजवला. उजाड वाटणाऱ्या शाळेचा परिसर बदलण्यासाठी मुलींच्या व शिक्षकांचे आणि मुख्याध्यापकांनी साहेबांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी करंजी, तुळस, आंबे, चीचूके, शेवगा, लिंबूळ्या, सदाफुली, तुळशीच्या मंजुळा अशा बऱ्याच झाडांच्या बिया जमा करून एका मेन कापडाच्या पिशवीत प्रत्येक वेगळ्या बियांची वेगळ्या पिशवीत बिया जमा केले. त्यावरती त्या विद्यार्थ्यांचे नाव, झाडांच्या बियाचे नाव, शाळेचे नाव टाकून पिशवी बंद पॅक केले. मुलांनाही खूप आनंद झाला. मुलांना आवाहन करण्यात आले की, तुमच्या घरातील, अंगणातील झाडांची बी शेतातील परिसरातील आढळणाऱ्या झाडांच्या बिया आता खूप जमायचे आहेत.

काय आश्चर्य! मुलांनी जवळपास 220 बियांच्या पिशव्या तयार केल्या. यानंतर आपणाला मुलांनो या पुढचा टप्पा गाठायचे असे आवाहन केले. आपण जून –जुलै महिन्यात म्हणजेच पाऊस पडायला लागला की

उघडे, बोडके डोंगर, रस्त्याच्या सडकेच्या बाजूला रिकाम्या जागेत, अंगणात शाळेतील रिकाम्या मैदानात आपण बिया लावण्याच्या उपक्रम हाती घेतला. आपण तिथे जाऊन बियांची पेरणी करूयात आणि एक बी रुजले तर किती झाडे तयार होतील व एक झाड माणसात सुरुवातीपासूनच झाड आणि आई मनुष्याच्या जगण्यासाठी आवश्यक अन्न वस्त्र निवारा आणि प्राणवायू म्हणजेच ऑक्सिजन इत्यादी गोष्टी विनामूल्य दिले आहेत. मुलांना आपोआप झाडाचे महत्व समजले. झाडेही सूर्याच्या अल्ट्राव्हायोलेट किरणांना पृथ्वीवर येण्यापासून रोखतात. ज्या ठिकाणी जास्त झाडे असतात. तेथील ओझोन थर चांगल्या प्रमाणात असतो.

हवा ही ऊर्जा आहे.

पाणी हे अमृत आहे.

मातीही जननी आहे.

झाड तर जीवनदायीनी आहे.

झाडाशिवाय जमिनीत पुरेसे पाणी साठवण अशक्य आहे. जिवंत साठ्याचे पाणी आज तरी भूगर्भातील संपलेली आहे. कारण जिवंत पाणी खोलवर जाण्यासाठी नैसर्गिक यंत्रणा असते झाड एका दिवसाला 50 फुटावर दहा लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते. हे जमिनीच्या जेवढ्या उंचीपर्यंत असेल तेवढीच खोलवर त्यांची मुळे असतात. म्हणून झाड हे निसर्गाची बिन खर्चाची पाईपलाईन आहे.

हे ओळखून खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आले.

- झाडाच्या बिया लावण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली.
- प्रत्यक्ष जमिनीची मशागत करून बियांचे रोपण केले.
- झाडे आपणास विनामूल्य अनेक गोष्टी देते हे मुलांना कळले.
- पर्यावरणीय क्षेत्र भेटीतून मुले संवेदनशील बनली.
- शेतकऱ्यांच्या मुलाखती घडवून आणल्या.

## ५. नवोपक्रमाचे महत्व

a. हा उपक्रम मुलांकडून राबवल्याने मुलांना प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात राहता आले

b. मुलांना पर्यावरणाची आवड निर्माण झाली.

c. वेगवेगळ्या बियांची मुलांना ओळख झाली.

d. मुले निसर्गाच्या बाबतीत संवेदनशील बनली.

e. बी रुजवणे व वाढवणे हा सर्जनशील अनुभव मुले घेऊ लागल्याने पर्यावरणाविषयी जवळीकता वाढली.

f. मुले पर्यावरणप्रेमी बनली.

## ६. प्रत्यक्ष कार्यवाही.

**नवोपक्रम राबविताना खालील कार्यवाही करण्यात आली.**

a. **बियांची पिशवी तयार करणे**

मार्च महिन्यात मुलांना आवाहन करून परिसरातील, अंगणातील, शेतातील झाडांच्या बिया जमा करून घेतल्या. त्या बियांची पिशवी तयार केली. त्या पिशवी वरती कोणत्या झाडाची बी आहे हे ओळखण्यासाठी त्या झाडाचे नाव लिहिण्यात आले. विद्यार्थ्यांचे नाव शाळेचे नाव ही लिहण्यात आले आणि त्या बियाला पॅक बंद पिशवीमध्ये बंदिस्त केले.

**b. बी रुजवण्यासाठी जागा तयार केल्या.**

एकदाची बियाची बँक अर्थात पिशवी तयार झाल्यानंतर ते बी रुजवण्यासाठी एप्रिल मे मध्ये आपल्या अंगणात शेतात शाळेत मोकळ्या जागेत खड्डे करून बी रुजवण्यासाठी जागा तयार करण्यात आली.

**c. प्रत्यक्ष बियांच्या पिशवीचे वाटप**

बीयांची तयार केलेली पिशवी ते बी रुजवण्यासाठी जागा तयार केली आणि मे जून मध्ये बीयांच्या पिशव्या मुलांना सोपविण्यात करण्यात आल्या.

## d. सुट्टीच्या दिवसात बियांचे मोकळ्या जागेत पखरण केले

सुट्टीच्या दिवसात मुले मामाच्या आणि मावशीच्या गावाला जाताना रस्त्याच्या कडेने, शेतात, जागेत डोंगरावर टाकण्यासाठी सांगितले आणि त्याच प्रमाणे मुले अनेक जण गावाला गेल्यानंतर सोबत बियांच्या पिशव्या घेऊन बस मधून रिकाम्या जागेवरती मुलांनी आपल्या जमवलेल्या बिया शिंपडून टाकल्या.

## e. प्रत्यक्ष वृक्षारोपण

जून जुलैमध्ये मेघराजांचे आगमन होताच धरणीमाता तृप्त झाली की मुलांनी तयार केलेल्या जागेत झाडे लावली. मोकळ्या अंगणात, शेतात, रस्त्याच्या कडेला, शाळेच्या परिसरात झाडे लावली

## g.एक मूल एक झाड दत्तक योजना

शाळेच्या परिसरात लावलेल्या झाडांची मुलांच्या संख्येच्या प्रमाणामध्ये गटनिहाय मुलांना झाडे दत्तक देण्यात आली. आपण लावलेल्या झाडाची काळजी मुले स्वतःहून घेऊ लागली झाडाच्या भोवतांचे तोंड काढणे पाणी देणे ही कामे मुले स्वतः आनंदाने करू लागली. पण लावलेल्या झाडाची काळजी घेणे यातला आनंद काही औरच असतो याचे दर्शन मुलांना झाले.

## ह. लावलेल्या झाडाचे महत्व सांगणे

मॅडम मी अजून एक मुलांच्या समोर आवाहन ठेवली. आपण लावलेल्या झाडाचे उपयोग महत्त्व सांगा आणि आश्चर्य असं झाले मुले स्वतःहून लावलेल्या झाडाची माहिती मोबाईलवरून, गुगलवरून, पुस्तकांमधून शोधून त्यांचे महत्त्व प्रत्यक्ष व्हिडिओ रूपामध्ये शाळेच्या ग्रुपवरती टाकू

लागले. एकंदरीत मुलांना झाडे लावून थांबले नाही तर त्या झाडांचे महत्त्वही स्वतःहूनच माहिती मिळून जाणून घेतले.

## h. मुले सर्जनशील बनली

आपण लावलेल्या झाडांचे तर महत्त्व सांगू लागलेस एवढेच नाही तर आपण लावलेल्या झाडांची कथा कवितेच्या रूपातही मुले व्यक्त होऊ लागली. एकंदरीत मुलावर पर्यावरणाचा संस्कार अतिशय छान बिंबवल्याने मुले नवनिर्मिती करून त्यांचेही जवळपास पर्यावरणावर आधारित कवितेच्या 200 कविता एकत्रित करून त्यांचे हस्तलिखित करण्यात आले. आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी मध्ये प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचे प्रकाशन करण्यात आले.

## i. वृक्षदिंडीतून पर्यावरणाचे महत्त्व

आपण लावलेले झाड व झाडाचे महत्व मुलांना पटल्याने आषाढी एकादशीच्या निमित्ताने वृक्षदिंडीचे आयोजन करून **पर्यावरण श्रेष्ठ की मानव श्रेष्ठ हा वाद–विवादासाठीचा विषय** घेऊन अनेक मुलांनी त्यावरती भाषणे केली. एकाचा मुद्दा एकाने अतिशय चांगले पद्धतीने खोडून

काढून पर्यावरण किती श्रेष्ठ आहे हे समजून आणि पटवून सांगितले. मुलाने झाडे पाने वनस्पती प्राणी यांचे महत्त्व सांगणारे घोषवाक्य वृक्षदिंडी यातून पक्षाचे देखावे करून वृक्षाचे महत्त्व पर्यावरण वाचवा पर्यावरण वाचवा हा अतिशय महत्त्वाचा संदेश गावभरामध्ये दुमदुमला.

## j. शेतकऱ्यांच्या मुलाखती

पर्यावरणाचे महत्त्व समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष शेतात जाऊन दिवसभर शेतीतील कामे, मातीचे प्रकार, पिकांचा प्रकार, खत, सिंचनाच्या पद्धती, सेंद्रिय खताचे महत्त्व, शेती संशोधनातील संधी, प्रत्यक्ष झाडाच्या पाचोळ्या पासून सेंद्रिय खताची निर्मिती इत्यादी दर्शन प्रत्यक्ष मुलाने अनुभवातून घेतल्याने हा अनुभव मुलांसाठी चिरकाल टिकणारा आणि आनंद देणारा ठरला.

## k. नैसर्गिक क्षेत्र भेटी

नैसर्गिक क्षेत्र भेटीचे आयोजन ऑक्टोबर महिन्यामध्ये करण्यात आले. असून मुलांनी दिवसभरामध्ये बांधावरची शेती प्रत्यक्ष भेट दिल्याने उसाचे क्षेत्र त्यांचे महत्त्व समजून घेतले. अनेक झाडे फुले पक्षी फळ फुले यांचे प्रत्येक दर्शनातून महत्व मुलांनी समजून घेतल्यानंतर घेतल्याने त्यावर अनेक कथा प्रसंग वर्णन कविता मुलांनी केल्या अर्थात मुले नवनिर्मिती करणारे सर्जनशील बनले.

## ७. नवोपक्रमाचे निष्कर्ष

1. शाळेत बियांची बँक मुलांकडून तयार केल्याने शाळा भेटीला आलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताला निसर्गातील पाने फुले तोडून निसर्गाला इजा न पोहोचू देतात तयार झालेल्या बियांची पिशवीच पाहुण्यांना भेट म्हणून देण्यात आल्या.

2. पर्यावरणाच्या प्रत्यक्ष कृतीतून मुलावर संस्कार बिंबवता आले.

3. पर्यावरण रक्षणासाठी मुलांनी मातीचे म्हणजेच पर्यावरण पूरक गणेश मूर्ती व पर्यावरण पूरक आकाश कंदील हे बनवून त्याचा प्रत्यक्ष वापर केला

4. दिवाळीतही पर्यावरण पो पोषक आकाश कंदील बनवून प्रत्यक्ष त्याचा उपयोग केला.

5. क्षेत्रभेट नैसर्गिक सहल त्यांच्या शेतकऱ्यांच्या मुलाखती बिया जमा करणे यामुळे निसर्गाचा सहवास मुलांना घडला.

6. मुलांना निसर्गाशी जोडण्याची संधी मिळाली.

7. मुलांना या उपक्रमातून वने वन्यजीव यांची ओळख तर झाली पण प्रत्यक्ष सांस्कृतिक व नैसर्गिक वारसा जपण्यासाठी मुले प्रयत्नशील बनले.

8. विद्यार्थ्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली.

## ८. नवोपक्रमाचे फायदे

- पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी व पर्यावरण संरक्षणासाठी स्वच्छ व समतोल परिसर पर्यावरण ठेवण्यासाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर मुले टाळू लागली. परिसरातील कचरा व घनकचरा कचराकुंडी टाकू लागले. होळीसाठी वृक्षतोड न करता कचऱ्याची व दुर्गुणाची होळी करणे याची जाणीव मुलांना झाली.
- पर्यावरण पूरक गणेश उत्सव मुलांनी शाळेत गणपती बनवून त्याची प्रात्यक्षिक घेतल्याने मुलांना पर्यावरणाचे तर महत्त्व कळालेच पण आपण बनवलेल्या गणपती पूजेसाठी ठेवण्यात आला व त्याचे विसर्जनही मातीच्या गणपती असल्याने झाडाच्या बुडाखाली करण्यात आले.
- दिवाळी निर्धूर, आवाज विरहित साजरी करण्यासाठी संदेशाची दिवाळी मुलांनी स्वत:हून साजरी केली व आकाश कंदील ही स्वत:च बनवले.

- शिक्षकांनाही प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात जाऊन मुलांना प्रत्यक्ष अनुभवाचे ज्ञान देण्याची संधी मिळाली.
- शाळा भेटीला आलेल्या पाहुण्यांना प्रवासादरम्यान रिकाम्या जागेत रस्त्याच्या बाजूला उघड्या डोंगरावर बियांची पिशवी दिलेल्या भेटीतून बियांचे प्रसरण करून पर्यावरण संरक्षण जपण्याचा एक महान संदेश मुलांच्या करवी देण्यात आला.
- भविष्यात येणाऱ्या पर्यावरणाच्या व जलसंपत्तीचे संरक्षण करणे वनशेती, वनराया निर्माण करणे, एक तरी झाड लावू मित्रा याचे महत्त्व पटले. घर परिसर कुंड्यांनी मुलांनी सजवले. आपण आपल्या परीने पर्यावरणाचे रक्षण केले तर निसर्गाचा समतोल व पर्यावरण प्रदूषणाच्या आक्रमणास आपोआप बंधने पाळले जातील यात शंका नाही.
- नवनिर्मितीचा व सर्जनशीलतेचा आनंद मिळाला.

## ९. नवोपक्रमाची सध्यस्थिती

1) एक बी उद्यासाठी भविष्यासाठी जगण्यासाठी हा नवोपक्रम राबविल्याने शाळेच्या परिसरात 200 च्या वर झाडे लावण्यात आली.

2) झाडे मुलांना दत्तक दिल्याने पर्यावरणाविषयी जागरूकता झाली.

3) सन समारंभ, वाढदिवसानिमित्ताने झाडे भेट देऊ लागले.

4) मुले मध्यान्ह भोजनासाठी गोल बसून जेवन करू लागली.

5) जेवणाचा डबा धुणे, हात धुणे झाडाच्या भोवती करू लागले.

6) पाण्याच्या साठवणीचे महत्त्व कळले.

7) डाळ तांदूळ धुतलेला भाजीपाला यांचे पाणी झाडाला देऊ लागले.

8) आवश्यक तेवढाच विजेचा वापर करू लागले

9) शाळा सुटल्यानंतर दोघांनी लाईट फॅन खिडक्या बंद करण्याची जबाबदारी घेतली

10) पुस्तके फाटणार नाहीत म्हणून जुने वर्तमानपत्राचे कव्हर लावू लागले

11) झाडाच्या सभोवताली तन काढणे, मुले झाडाची पानही तोडत नाहीत.

## १०. नवोपक्रमाची यशस्विता

- मुलांमध्ये सूक्ष्म निरीक्षण क्षमता वाढली.
- संवेदनशीलता वाढली
- पर्यावरण संरक्षणाविषयी जागरूक झाली
- श्रमप्रतिष्ठा वाढली
- वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास झाला.
- समस्या निराकरण करण्याची सवय लागली

- सर्व विषयाची समवाय
- मुलांना सोबत घेऊन परसबाग तयार झाली.
- पर्यावरणीय क्षेत्रभेटीचा फायदा हा मुले संवेदनशील बनल्याने कथा कवितेतून आपली निरीक्षणे नोंदवू लागली.
- कृषी क्षेत्रभेटीतून शेतकऱ्याच्या मुलाखती घेतल्याने शेतीसंबंधी जागरूकता वाढली.
- अनेक वर्तमानपत्राने दाखल घेतली.
- नवोपक्रमाचे नाविन्य म्हणजे शिक्षण संक्रमण मासिकानेही दखल घेऊन लेख प्रकाशित केला.
- पर्यावरणसंबंधी अनेक प्रश्नावर जसे जलपुनर्भरण, पशुपक्षासाठी झाडांना झाकण्या बांधून वन्यजीवांचे तहान भागवू लागले.
- शालेय पोषण आहारातला तांदळाचे बारीक जमा करून पशु पक्षासाठी अन्न म्हणून ठेवू लागले

## ११. संदर्भ साहित्य

अ. दिनविशेष भाषणे. अनुसया कुंभार, विद्याभारती प्रकाशन, ०५ सप्टेंबर २०१६

आ. जीवन शिक्षण मासिक, जुलै २०१५, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

इ. जीवन शिक्षण मासिक, जून २०१३, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

ई. जीवन शिक्षण मासिक, २०१५, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

## १२. संदर्भाने महत्वाच्या युट्युब लिंक

- https://youtu.be/Xm14EruO2r0
- https://youtu.be/QNwknFtRUo8
- https://youtu.be/JoYlq6o9gds
- https://youtu.be/4UOpLh28iQ8
- https://youtu.be/gGkGal9ujKE

✸

- ✸ https://youtu.be/DTvzCY5dyKU
- ✸ https://youtu.be/1ha8lNamouo
- ✸ https://youtu.be/JoYlq6o9gds
- ✸ https://youtu.be/shbE-gLfPUg
- ✸ https://youtu.be/o_y0xjQp5As
- ✸ https://youtu.be/prg6WBIV4Pc
- ✸ https://youtube.com/shorts/WYzMkrTdsik?feat ure=share
- ✸ https://youtu.be/4UOpLh28iQ8
- ✸ https://youtu.be/XEs4vXOu8Qo
- ✸ https://youtube.com/shorts/nSOMdPc0Cwk?fea ture=share
- ✸ https://youtu.be/xRr_4-VJ9b8
- ✸ https://youtu.be/30vMuOJ7U5Q

- ✸ https://youtu.be/nyIhW-5mKHo
- ✸ https://youtube.com/shorts/JKU4y12pC7E?feature=share
- ✸ https://youtu.be/5z-0mp6UhNM
- ✸ https://youtu.be/rgUKmCKCqD4
- ✸ https://youtu.be/fLS7FCqDg4M
- ✸ https://youtu.be/JoYlq6o9gds

✻✻✻